दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी २९ डिसेंबर २०२४

# विमा समस्येची समज आणि गरज

संपादकीय

एका धक्कादायक घटनेत, एका आघाडीच्या विमा कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची त्यांच्या निवासस्थानाबाहेर निर्घृण हत्या करण्यात आली. हे जघन्य कृत्य एका विमाधारकाच्या वारंवार नाकारल्या गेलेल्या दाव्यांमुळे आलेल्या संतापातून उद्भवल्याचे सांगितले जाते. या दुर्दैवी घटनेने विमा कंपन्यांच्या नैतिकता, कामकाज आणि जबाबदारीबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. या शोकांतिकेने विमा उद्योगातील दाव्यांच्या नकारासंबंधित प्रणालीगत समस्यांवर प्रकाश टाकला आहे आणि या कृतींचा व्यक्ती आणि कुटुंबांवर होणारा विनाशकारी परिणाम समोर आणला आहे.

**विमा समस्येची समज**

विमा हा एक संकटाच्या काळात विमाधारकांचे संरक्षण करण्याचे वचन देणारा एक सुरक्षित पर्याय म्हणून विकला जातो. मग तो आरोग्य, जीवन, मालमत्ता किंवा वाहन विमा असो, या विमा काढण्याचा उद्देश एकच राहतो तो म्हणजे आपण आज प्रीमियम भरून उद्या नुकसानभरपाई मिळवता येते. तथापि, प्रत्यक्षात या उद्देशापासून वेगळेच घडत असते. अनेक विमाधारकांचे यावर वाद होतात, विमा कंपन्याचे सूक्ष्म मुद्रण, प्रक्रियात्मक त्रुटी किंवा रुग्णाला पैसे देण्यासाठी थेट नकार या गोष्टींनी आधीच शारीरिक आणि मानसिक हैराण असलेला रुग्ण अथवा त्याचा नातेवाईक हतबल होतो

**आकडेवारी काय सांगते?**

आकडेवारी चिंताजनक प्रवृत्ती दाखवते:

- अलीकडील आकडेवारीनुसार, अंदाजे १०-१५% विमा दावे दरवर्षी नाकारले जातात.
- काही प्रकरणांमध्ये, दाव्यांच्या मंजुरीसाठी महिन्यांपासून वर्षांपर्यंत विलंब होतो, ज्यामुळे विमाधारकांवर आर्थिक आणि भावनिक ताण वाढतो.
- सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, पारदर्शकतेचा अभाव आणि खराब संवाद ही कारणे विमाधारकांचा विश्वास गमावण्यास सर्वाधिक कारणीभूत ठरतात.

हा प्रणालीगत अपयश केवळ विश्वास कमी करत नाही तर, व्यक्तींना टोकाची पावले उचलण्यास प्रवृत्त करते, जसे की मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हत्येसारख्या घटना.

**सखोल विश्लेषण: दावे का नाकारले जातात?**

१. **सूक्ष्म मुद्रण आणि अपवाद**


विमा पॉलिसी या अनेकदा गुंतागुंतीच्या भाषेत आणि लपवलेल्या अपवादांसह लिहिलेल्या असतात असे नसून आहेत. त्यामुळे विमाधारक विमा घेताना न वाचता अथवा न समजून घेता अयोग्यपणे कव्हरेज मर्यादा मान्य करू शकतात आणि दावा दाखल करताना या मर्यादा त्याला जाणवतात.

२. **प्रक्रियात्मक त्रुटी**

अपूर्ण दस्तऐवज सबमिट करणे किंवा मुदती चुकणे यासारख्या साध्या चुका सामान्यतः दाव्यांच्या नकाराचे कारण म्हणून वापरल्या जातात. काही त्रुटी खऱ्या असू शकतात, परंतु इतर किरकोळ असून चांगल्या मार्गदर्शनाने दूर केल्या जाऊ शकतात.

३. **फसवणूक प्रतिबंध उपाय**

विमा कंपन्या म्हणतात की, फसवणूक दाव्यांना प्रतिबंधित करण्यासाठी कठोर छाननी आवश्यक आहे. तथापि, हे अनेकदा "योग्य परिश्रम" या नावाखाली वास्तविक दावे विलंबित किंवा नाकारले जातात.




**४. पॉलिसी भाषेतील अस्पष्टता**

अस्पष्ट कलमांमुळे विमाधारकांना कमी पर्याय राहतात. "योग्य काळजी" किंवा "पूर्वअस्तित्वाच्या स्थिती" यासारख्या अटी विमा कंपनीच्या बाजूने व्याख्या केल्या जातात.

**दावे नाकारल्याचा परिणाम**

**१. आर्थिक विनाश**

अनेकांसाठी, विमा ही संकटाच्या काळात जीवनरेखा आहे. दाव्याच्या नकारामुळे वैद्यकीय बिले, मालमत्ता गमावणे किंवा आपत्तीमधून सावरण्यात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो.

**२. भावनिक त्रास**

दाव्यासंबंधी वाद हाताळण्याचा ताण, आर्थिक भारासोबत, गंभीर भावनिक त्रास निर्माण करू शकतो. टोकाच्या प्रकरणांमध्ये, ही निराशा हिंसाचार किंवा आत्महत्येसारख्या कृतींमध्ये दिसून येते.

**३. विश्वासाचा ऱ्हास**

प्रत्येक नाकारलेला दावा विमा उद्योगाचा आधार असलेल्या विश्वासाला तडा देतो. व्यापक संशयामुळे संभाव्य ग्राहकांना विम्यापासून परावृत्त केले जाऊ शकते, ज्यामुळे क्षेत्राच्या वाढीवर आणि प्रतिष्ठेवर परिणाम होतो.

**समस्येचे निराकरण करण्यासाठी उपाय**

या प्रकरणातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या हत्येने विमा क्षेत्रात सुधारणा करण्याची तातडीची आवश्यकता अधोरेखित केली आहे. दावे नाकारण्याची मुळे दूर करणे आणि सार्वजनिक विश्वास पुनर्स्थापित करणे बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे:

१. पॉलिसी अटींमध्ये पारदर्शकता

- सरळ भाषेत पॉलिसी अटी तयार करा, ज्यामुळे सामान्य ग्राहकांना ती समजणे सोपे होईल.
- प्रमुख अपवाद आणि अटी स्पष्टपणे हायलाइट करा, गैरसमज टाळण्या

**संवाद सुधारित करा**

- विमाधारकांना दाव्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन करण्यासाठी समर्पित सहाय्यक टीम स्थापन करा.
- दाव्याच्या स्थितीबद्दल नियमित अद्यतने अनिवार्य करा, चिंता आणि गोंधळ कमी करण्यासाठी.

३. जलद निराकरण यंत्रणा

- दावा प्रक्रियेसाठी आणि निराकरणासाठी कठोर वेळापत्रक लागू करा.
- अनावश्यक विलंब किंवा चुकीच्या नकारासाठी दंड लावा.

४. नियामक देखरेख

- नैतिक मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी नियामक संस्थांद्वारे देखरेख मजबूत करा.
- प्रणालीगत समस्या ओळखण्यासाठी आणि त्यावर उपाय करण्यासाठी लेखापरीक्षा आणि तृतीय-पक्ष पुनरावलोकने सादर करा.

५. ग्राहक शिक्षण

- विमाधारकांना त्यांच्या हक्कांबद्दल आणि जबाबदाऱ्यांबद्दल शिक्षित करण्यासाठी जागरूकता मोहिमा सुरू करा.
- योग्य पॉलिसी समजून घेण्यासाठी आणि निवडण्यासाठी ग्राहकांना मदत करणारी संसाधने उपलब्ध करून द्या.

६. तक्रार निवारण प्रणाली

- वाद न्याय्यपणे हाताळण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करा.
- लांब लढाईसाठी पर्याय म्हणून मध्यस्थी आणि लवादाला प्रोत्साहन द्या.

**पान ८ वर**

ज्येष्ठ विधिज्ञ **श्रीनिवास घैसास** हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते **जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती** याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.

# खोरणी

## मनाच्या हिंदोळ्यावर



**बाबू घाडीगांवकर,**
**त्रिंबक, ता.मालवण.**
**मो. ९४२१७९५९५५.**



देवळातली बारा-पाच मानकऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत खोरणीच्या कार्यक्रमांचे व्यवस्थित नियोजन करून बारा-पाच मानकरी देवळाबाहेर पडले. गावातले हे देऊळ तसे गावाच्या मध्यवर्ती परिसरात. देवळाच्या बाजूने गावातून पलीकडील वाडीत जाण्यासाठीची पाणंद. देवळाच्या दुसऱ्या बाजूलाच असलेल्या धावशीच्या झाळीत चाळ्याचे देवस्थान. झाळीच्या बाजूला आप्पांचा विस्तीर्ण फणस आणि देवळाबाहेर पडझड झालेले पुरातन तुळशी वृंदावन. काही वर्षांपुर्वी देवीच्या देवळाचा जीर्णोद्धार झाला आहे. मात्र पुर्वीचे मंदिर आणि त्याची महती काय वर्णावी! नक्षीदार कोरीवकाम केलेले आडवे उभे लाकडी बार, त्यांची वाघ, सिंहासारख्या उग्र मुखवट्यांची टोके, लाकडी बारांवर मस्त कोरून चित्रित केलेले पौराणिक देखावे, नागदेवता, मत्स्यदेवता....अबाबा! पुर्वीचे लोक तर बाबा भारीच कसबी कारागीर होते!

साधारण सतराव्या शतकात त्या काळात मनुष्यबळाचा वापर करून बांधलेली ही देवळे, पंधरा ते वीस फुट उंचीचे उभे केलेले अखंड दगडी जाडजूड नक्षीदार खांब, त्यांवर दोन ते तीन घनफुटाचे बार... पुर्वीची माणसे अचाट ताकदीची, बलवान होती हेच खरे! जीर्णोद्धारानंतरचे आर.सी.सी. बांधकामाचे पावणाईचे देऊळ पुर्वीच्या लाकडी सामानाच्या देवळासारखे शोभिवंत व समृद्ध दिसत नाही हे पाहताक्षणीच जाणवते. त्यातही जुन्या देवळाची ते लाकडी व अप्रतिम कोरीवकाम केलेले खांब, बार देवळाच्या जवळपासही दिसत नाहीत. आपल्या पुर्वजांनी जतन करून ठेवलेला हा अनमोल ठेवा आम्ही तसाच जतन करून ठेवू शकलो नाही याची खंत वाटत राहते.

ग्रामदैवतांची वार्षिक डाळपस्वारी सुरु होण्याआधी काही 'दिक्पाल' देवस्थांचे देणे द्यावे लागते. गावाच्या चतुर्सीमा सुरक्षीत ठेवण्याचे, बाहेरच्या आपत्तीपासून, संकटांपासून, अगदी रोगराईपासून गावाला, रयतेला सुरक्षीत ठेवण्याचे काम हे दिक्पाल 'रक्षक' करीत असतात. दरवर्षी डाळपस्वारीआधी त्यांच्या नावाने खोरणी झाली की ते तृप्त होतात. आपापली सीमा राखण्यासाठी तत्पर होतात. एका अर्थाने मधल्या काळात काहीसे निद्रिस्त झालेले ते 'जागृत' होतात.


प्रतिक असते. खोरणीचा नारळ विठ्ठलादेवीने फोडणे म्हणजे एका दैवी शक्तिने पाशवी किंवा आसुरी शक्तिचा नायनाट करणे. हा खोरणीचा प्रसंग फारच नेत्रसुखद असतो.आज एकवीसाव्या शतकात वावरताना अशी खोरणी करणे, त्यामागचा उद्देश वगैरे एखाद्या वेळेस अनैसर्गिक किंवा कालबाह्य वाटतात. मात्र ही खोरणीची प्रथा आणि या खोरणीबद्दल आजदेखील लोकांच्या मनात अपार श्रद्धा आहे.

खोरणीचा नारळ खोरणीसाठी ठेवल्यावर विठ्ठलादेवीचा अवसर किंवा तरंग अचानक आक्रमक बनतो. ढोल ताशांच्या गजरात अगदी तालबद्धरीत्या हा खांबदुरी मोठ्या चपळाईने एकाच फटक्यात खोरणीचा नारळ फोडतो आणि पुढच्याच क्षणी विलक्षण वायुवेगाने पुढे धावत जातो,

खरेतर या खांबदुऱ्याच्या पायांत चपला नाहीत, किमान दहा ते पंधरा किलो वजनाची खांबकाठी खांद्यावर सावरून गरगर फिरवणे, ती अजिबात खाली पडू न देणे, खोरणीच्या वेळेस ही वजनदार खांबकाठी अगदी लीलया हातांवर, बोटांवर नाचविणे, खांबकाठी सावरीत, गरगर फिरवीत खिळीने नारळावर अचूक घाव घालणे वगैरे सारे अद्भुत वाटावे असेच असते. आजच्या काळातदेखील असे प्रसंग अंगावर शिरशिरी आणतात, रोमांच उभे करतात. कोकणातील वार्षिक डाळपस्वारीचा अनुभव घेताना वाटेत ठरावीक ठिकाणी घातले जाणारे खास खोरणीचे प्रसंग पाहण्यासाठी लोक गर्दी करतात.



हा वाटेतला आंबा. येनाजानारा पहिला दम येथे खातो.याच बांधावर गोयली,लाकडे उतरवली जातात.पाण्याच्या घोट घेतला जातो नी पुन्हा माणूस पुढच्या वाटेला लागतो. हा आंबा हायदेवांची खोरणी हा तसा साधा विधी. विठ्ठलादेवीच्या शिवकळेने किंवा खांबदुऱ्याने खांबकाठीच्या पोलादी किंवा पितळी खिळीने खोरणीचा नारळ एकाच फटक्यात फोडण्याचा हा विधी. मात्र ही खोरणी कशी होते, खोरणीचा नारळ कसा फुटतो, एखादे वेळेस खोरणीचा नेम का चुकतो यांवर पुढची काही गृहितके अवलंबून असतात. एखाद्या अंधारमेळ्यामुळे किंवा आडमेळ्यामुळेही कधी कधी खोरणी पडत नाही असे मानले जाते. खोरणी या शब्दाचा शब्दशः अर्थ नारळाचे फोडून तुकडे तुकडे करणे होय.



मात्र देवऱ्हाटीच्या किंवा डाळपस्वारीच्या भाषेत सांगायचे तर खोरणी घालणे म्हणजे दुष्ट किंवा पापी शक्तिंचा नाश करणे, निःपात करणे. खोरणीचा नारळ म्हणजे अशा दुष्ट शक्तिचे प्रतिक असते. आडमेळा किंवा अडचणींचेही कोकणातील पारंपारिक, धार्मिक प्रथा, परंपरांना एक अधिष्ठान आहे. प्रत्येक गोष्टीमागे एक शास्र आहे. कदाचित आजच्या काळाचा विचार करता खास 'विज्ञान' आहे. अशा काही प्रथा व परंपरा खरेच मानवी मनास, विचारधारेस अचंबित करणाऱ्या आहेत. दुष्टकर्म, दुष्कृत्य किंवा पापभावनेस नष्ट, नेस्तनाबूत करणारी ही खोरणीची प्रथा. मात्र तळकोकणातील प्रत्येक गावातील वार्षिक डाळपस्वारीचा एक अविभाज्य भाग आहे.





# गावाकडच्याआठवणी

## साखरांबी



भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

मे महिन्याची रखरखती दुपार.शाळेला उन्हाळी सुट्टी.आंब्यांचा सिझन.मग या दिवसात वाडीतील पोरं जमा होण्याचं एकमेव ठिकाण कोणतं असेल तर सुतारिन आजीची साखरांबी.नावाप्रमाणे आंबा चवीला इतका गोडवा नव्हता.पण आंबट गोड चवीचा असणारा आंबा पोरांना मात्र भारीच वाटायचा.साखरांबी हे नाव त्या आंब्याला नसून झाडाला पडले होते.त्यावेळी कुणाच्या कलामावरचे आंबे,काजू काढायला बंदी ठरविण्यात येत होती.पण साखरांबी खाली मात्र मोकळं रान होतं.कुणीही यावं. बसावं.पडलेले आंबे टीपावे.कारण सुतारिन आजीचं अस काही विशेष बंधन नव्हतं.तिचा लहान मुलांवर खूप जीव होता.तिच्या नातवाच्या लाडासोबत वाडीतील लहान मुलांचे ही लाड होत होते.वाडीतील मुलांसाठी जणू काय ते उद्यान होतं असं वाटायचं. घरासमोर शेत आणि शेताच्या बांधला लागून काजू आणि साखरांबी.दरवषी काजूचे झाड आणि साखरांबी ही भरभरून यायची.तेव्हा मौज मजा करण्यासाठी ते सुरम्यी दिवस आम्हा मुलांसाठी बातच न्यारी होती. आता ते दिवस म्हणजे केवळ आठवणींचा खेळ आहे.

वरच्या चोंड्यात अंडर आर्म क्रिकेट.भिडू भिडू आणून पाडलेली टीम. बांधाखाली डायरेक्ट आऊट. वरच्या बांधाला डायरेक्ट लागले की आऊट.पुढे सिक्स आणि फोर. बाकी धावून रन. एकतर झापाची किंवा फळीची बनवलेली बॅट असायची.तीही एकच. नॉन स्टायकरकडे बॅट म्हणून धावायला काठी.ती धावून मोडली की दुसरी घ्यायची.एक रबरी चेंडू आणि साखरांबीचे ठिकाण एवढंच त्या दीड दोन महिन्यात माहीत असायचं.

साखरांबीचा आघाडा तसा बराच विस्तीर्ण.दोन घेऱ्यात मावणार नाही इतका मोठा बुंधा.सरळसोट उंच गेलेली. त्यामुळे झाडावर चढणे मुलांना शक्यच नसायचे.तिच्या गर्द आमराईची सावली तीन चोंड्यात पसरलेली असायची.कधीच उन्हाची तिरपी किरणे डोळ्यांवर आली नाहीत.बाकी बसायला,उड्या मारायला ऐसपैस जागा.

आंब्याचा हंगाम सुरू झाला की आम्हा लहान मुलांना कच्चेबिच्चे आंबे खाण्याची हाऊस साखरांबी भागवत होती. वाडीच्या मधोमध उभं असणारं अतिविस्तीर्ण आंब्याचे झाड म्हणजे इतर लहान झाडांचा तो खडूस बापच वाटायचा. एप्रिल, मे महिना आला की आम्हा मुलांना जंगल सफारी घडे.आंबे पिकण्याच्या हंगामात वाडीतील सर्व शेलटी पोरं आंब्याखाली खेळत असत.कधी पिकलेला एखादा आंबा खाली पडतो आणि आम्हाला मिळतो असे व्हायचे. आंबा पडताच क्षणी सर्वांची झडप त्या आंब्यावर पडायची. ज्याला आंबा भेटला तो खुश आणि ज्याला नाही भेटला तो वाईट तोंड करून पुन्हा आपल्या जागेवर उभा राहून आंबा पडण्याची वाट बघायचा. तशी प्रत्येकाची एक झिपटलेली विशिष्ट जागा असायची. त्या जागेवर त्याच्याच हक्क असायचा.

कोणी आंब्याच्या बुंधात.कोणी जमिनीतून बाहेर पडलेल्या जुनाट पाळावर तर कोणी एखाद्या मोठ्या दगडावर अथवा बांधावर उभा राहायचा. कोण वरच्या शेतात तर कोण खालच्या शेतात उभा राहायचा.वारा सुरू झाला की सर्वजण आंबा पडण्याची वाट बघत असत. "ये ये वाऱ्या आंबा पाड" "आंब्याची बाटी साखर चाटी" अशी गाणी गात आंबा महात्म्य सुरू असायचे.जसे जणू की योद्धा सीमेवर सज्ज असतो त्याप्रमाणे आम्ही आंबा मिळवण्यासाठी सज्ज. वारा,आंबा पडण्याचा आवाज, अचूक लक्ष्य या तीन गोष्टीमुळे वारा थांबेपर्यंत हृदयात धडधड वाढायची.सावधान एके सावधान अशी परेड होती.एखादी उडी मारताना कधी ढोपर तर कधी कोपर फुटायचा, पण त्याची बिलकुल पर्वा नसायची.ज्याला आंबा मिळायचा तो राजा माणूस.दोनदोन तीनतीन तास आमयुद्ध करून सुद्धा एकही आंबा मिळाला नाही तर मात्र एकदुसरा रडकुंडीला देखील येत होता.एखाद्याची "आयस" येऊन त्याला शिमटीने मारत मारत घरी हाकलत नेत होती.एखाद्याचा बापुस शिव्या देत यायचा.तशी वाडीत अनेक आंब्याची झाडे होती,पण साखरांबी खाली जी मजा येत असायची,ती दुसऱ्या ठिकाणी नसायची.तसा खोबरांबा देवळाजवळची लेटी,गोल्यांबा,ढेऱ्यांबा असे अनेक आंब्याची झाडे वाडीत प्रचलित होती.

साखरांबी खाली आंबे टिपताना अनेक खेळ देखील सुरू असायचे. खास करून पाण्याची पाईप लाईन गेली होती त्या लोखंडी पाईपावरून अलगद सावरत चालअसत. "ये ये वाऱ्या आंबा पाड" "आंब्याची बाटी साखर चाटी" अशी गाणी गात आंबा महात्म्य सुरू असायचे.जसे जणू की योद्धा सीमेवर सज्ज असतो त्याप्रमाणे आम्ही आंबा मिळवण्यासाठी सज्ज. वारा,आंबा पडण्याचा आवाज, अचूक लक्ष्य या तीन गोष्टीमुळे वारा थांबेपर्यंत हृदयात धडधड वाढायची.सावधान एके सावधान अशी परेड होती.एखादी उडी मारताना कधी ढोपर तर कधी कोपर फुटायचा, पण त्याची बिलकुल पर्वा नसायची.ज्याला आंबा मिळायचा तो राजा माणूस.दोनदोन तीनतीन तास आमयुद्ध करून सुद्धा एकही आंबा मिळाला नाही तर मात्र एकदुसरा रडकुंडीला देखील येत होता.एखाद्याची "आयस" येऊन त्याला शिमटीने मारत मारत घरी हाकलत नेत होती.एखाद्याचा बापुस शिव्या देत यायचा.तशी वाडीत अनेक आंब्याची झाडे होती,पण साखरांबी खाली जी मजा येत असायची,ती दुसऱ्या ठिकाणी नसायची.तसा खोबरांबा देवळाजवळची लेटी,गोल्यांबा,ढेऱ्यांबा असे अनेक आंब्याची झाडे वाडीत प्रचलित होती. साखरांबी खाली आंबे टिपताना अनेक खेळ देखील सुरू असायचे. खास करून पाण्याची पाईप लाईन गेली होती त्या लोखंडी पाईपावरून अलगद सावरत चालत जाणे.जो पडेल तो हरला. तसेच साखरांबीला खेटून असणारा फणस, वरच्या बांधावरचा बरका फणस, बाजूला चिंच आणि काजू असल्याने लपाछपीच्या खेळातून अवर्णनीय आनंद मिळत होता. तसेच चपट्या दगडाचे तुकडे घेऊन "चकचक"खेळणे म्हणजे नेमबाजी शिकण्यासारखे होते. यामधे ज्याच्यावर डाव आला असेल त्यांनी ठराविक अंतरावर चक फेकायचे आणि बाकीच्यांनी त्याला नेम धरून मारायचे. ज्याचा नेम लागणार नाही त्याच्यावर डाव.काजूच्या डब बियाणे सॉरट कॉरट खेळणे म्हणजे एकमेकांना गंडवणे होते. यात सुद्धा एक वर्तुळ काढून मध्यभागी आडवी रेषा मारून दोन तीन पावलावर बिया फेकायची लाईन मारायची. तिथून पाडलेल्या वर्तुळात बिया फेकायच्या. ज्याचा नंबर असेल तो कोणती बी बाहेर काढायची हे सांगायचा. नेम धरून ती बी वर्तुळा बाहेर काढायची.काढली तर त्यात जाणे. जो पडेल तो हरला. तसेच साखरांबीला खेटून असणारा फणस, वरच्या बांधावरचा बरका फणस, बाजूला चिंच आणि काजू असल्याने लपाछपीच्या खेळातून अवर्णनीय आनंद मिळत होता.

तसेच चपट्या दगडाचे तुकडे घेऊन "चकचक"खेळणे म्हणजे नेमबाजी शिकण्यासारखे होते. यामधे ज्याच्यावर डाव आला असेल त्यांनी ठराविक अंतरावर चक फेकायचे आणि बाकीच्यांनी त्याला नेम धरून मारायचे. ज्याचा नेम लागणार नाही त्याच्यावर डाव.काजूच्या डब बियाणे सॉरट कॉरट खेळणे म्हणजे एकमेकांना गंडवणे होते. यात सुद्धा एक वर्तुळ काढून मध्यभागी आडवी रेषा मारून दोन तीन पावलावर बिया फेकायची लाईन मारायची. तिथून पाडलेल्या वर्तुळात बिया फेकायच्या. ज्याचा नंबर असेल तो कोणती बी बाहेर काढायची हे सांगायचा.नेम धरून ती बी वर्तुळा बाहेर काढायची.काढली तर त्या बिया आपल्या.असा हा खेळ कुणाला भिकारी तर कुणाला राजा बनवत असे.त्याचबरोबर डोंगर का पाणी याप्रमाणे दगड का माती हा पण खेळ चालायचा.यात चपळता दिसून यायची.

तर हॉकीच्या प्रकारात मोडणारा "काठीकाठी" हा खेळ पळवत असायचा.ज्याच्यावर राज्य असायचे त्याची काठी उडवत घेऊन जायची.आपली काठी मात्र दगडावर असली पाहिजे.ज्याची नसेल आणि त्याला शिवले तर तो बाद.मग त्यांनी त्याच्यावर डाव देण्यासाठी जिथे बाद केले असेल तिथून लंगडी घालत,पायात काठी धरून वर्तुळात आणायची.

एकदा का आंब्याचा सिझन चालू झाला की घरात कोणीही थांबत नसे.साखरांबीच्या घनदाट छायेखाली जाऊन खेळत. दुपारचे जेवण नसले तरी एका दुसरा आंबा,काजू खाऊन भागत होते. दिवस कसा निघून जायचा हे त्यावेळी कळत देखील नव्हते. जसजसे मोठे होत गेलो. दहावी शिकून शहरात आलो. तसा साखरेप्रमाणे वाटणारा हा अनोखा गोडवा दुरावत गेला आणि त्यासोबत खेळही लुप्त होत गेले. ते दिवस, ती मजा आठवली की मन पुन्हा साखरांबी खाली धावते.



# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग - ६
## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

**हक्कनोंदणीची सुरुवात**

सन १८९७ मध्ये भारत सरकारने हक्क नोंद - (हक्क अभिलेखा किंवा अधिकार अभिलेखा) या विषयावर प्रथम चर्चा सुरू केली. सन किंवा अध्ये याबाबत प्रयोग करण्याचे आदेश काढण्यात आले. पूर्वीचा ३८९८ प्रांताच्या अधिकारक्षेत्रात १८९९ मध्ये हे प्रयोग पार पाडण्यात आले. हक्क नोंद या विषयावर १९०३ मध्ये संहिता तयार करण्यात आली. हक्क सवारील ही पहिली संहिता होय. ही संहिता नंतर रद्द करण्यात आली. सुधारित मुंबई जमीन महसूल संहिता १९१३ च्या प्रकरण १०-अ मध्ये समयका नोंदीच्या या तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. जमीन महसूल देण्याची जबाबदारी हक्क नोंदीच्या आधारावर निश्चित करण्यात येते.

मध्य प्रदेश जमीन महसूल संहिता १९१७ मधील हक्क नोंदीमध्ये काही अभिलेखा समाविष्ट होत्या. त्यामध्ये जमाबंदीच्या वेळी तयार केलेले कागदपत्र त्यामध्ये नावे, मालककुळ, त्यांचे हक्क, त्यांच्याकडील धारणा क्षेत्र, गावचे प्रशासकीय कागद, नकाशा हे कागदपत्र समाविष्ट होते. याशिवाय मालकीबद्दलचे हक्कबदल नोंदवहीत तहसीलदार अद्ययावत ठेवीत असत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या प्रकरण १०-अमध्ये हक्क नोंदीच्या कायदेशीर तरतुदी समाविष्ट आहेत. हा कायदा सर्व महाराष्ट्र राज्यात (म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मध्य प्रदेशातील पूर्वीचे जिल्हे आणि मराठवाडा) एकसारखेपणाने लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या दहाव्या प्रकरणामध्ये हक्क नोंद तयार करून ठेवण्याबाबत कायदेशीर तरतुदी केलेल्या आहेत. यातील भोगवट्याखालील जमिनीबाबत हक्क नोंदणी पत्रके 'अ' विभागातील कलमे १४७ ते १५९ ची समाविष्ट आहेत. तर 'ब' भागात भोगवट्यात नसलेल्या जमिनीबाबतचे हक्क विशद करणारी कलमे १६० ते १६७ ची समाविष्ट आहेत.

**१० ऑगस्ट १९६७ रोजी एक अधिसूचना काढून पुढे दर्शविलेल्या जमिनींना कलम १४८ ते १५९ (दोन्ही धरून) चे नियम लागू होणार नाहीत.**

१) कलम १२२ खाली ठरविलेली आणि उक्त अधिनियमाखाली मोजणी न केलेली गावठाणे किंवा गावच्या जमिनी.
२) मोजणी न केलेली गावे.
३) राखीव जंगलातील गावे.

या सर्व जमिनीच्या अनुषंगाने असणारा महत्त्वाचा कायदा म्हणजेच महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ हा होय. या कायद्याच्या कलमात अनेक गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. या कायद्यातील कोणत्या कलमामध्ये कशा संबंधीच्या तरतुदी केल्या आहेत? कुठल्या गोष्टींना कुठले कलम लागू होते? त्याची थोडक्यात माहिती करून घेऊ या.

**महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ मध्ये कलम ५ ते १६ अंतर्गत जी महसूल अधिकाऱ्यांची कर्तव्ये आहेत ती पुढीलप्रमाणे :**

कलम ५ नुसार नेमण्यात येणारा मुख्य अधिकारी म्हणजेच आयुक्त होय.

कलम ६ नुसार विभागातील महसूल अधिकारी हे विभागीय आयुक्त व त्याच्या मदतीकरिता एक अप्पर आयुक्त व गरजेनुसार आवश्यक तितके सहाय्यक आयुक्त नेमू शकतात.

कलम ७ मध्ये जिल्ह्यातील महसूल अधिकारी हा एक जिल्हाधिकारी व प्रत्येक तालुक्यात एक तहसीलदार नेमू शकतो.तसेच एक किंवा अधिक अप्पर जिल्हाधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी तालुक्यात एक किंवा अनेक नायब तहसीलदार. एक किंवा अनेक उपविभागाकरिता सहाय्यक किंवा उपजिल्हाधिकारी. प्रत्येक मंडलासाठी एक किंवा जास्त मंडलाधिकारी व मंडल निरीक्षक प्रत्येक मंडलाधिकाऱ्याच्या साहाय्यासाठी एक किंवा अनेक तलाठी, प्रत्येक गावासाठी किंवा गावांच्या गटासाठी कोतवाल किंवा तलाठी.

कलम ८ - भूमापन अधिकारी- वेळोवेळी आवश्यक वाटतील असे अधिकारी त्यावर जमाबंदी आयुक्त, संचालक उपसंचालक - भूमी अभिलेख, जमाबंदी अधिकारी, जिल्हानिरीक्षक भूमी अभिलेख, भूमापन - तहसीलदार यांचा समावेश.

कलम १३ - महसूल अधिकारी व कर्तव्ये - सदर संहितेने दिलेली किंवा शासनाने सोपविलेली कामे पार पाडणे, हाताखालच्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण

कलम १४ - भूमापन अधिकारी - अधिकार व कर्तव्ये - वरीलप्रमाणे

जमिनीबाबत - कलम २० ते ४०

जमिनीबाबत कलम २० ते ४० याविषयीची जी माहिती देण्यात आली आहे ती खालीलप्रमाणे :

कलम २० नुसार इतरांची मालमत्ता नसलेल्या सर्व जमिनी, सार्वजनिक रस्ते यावर राज्याचा मालकी हक्क राहील. शासनाने किंवा एखाद्या व्यक्तीने एखाद्या मालमत्तेबद्दल हक्क सांगितल्यास त्यावर निर्णय जिल्हाधिकारी किंवा जिल्हा भूमापन अधिकाऱ्याने नोटीस देऊन, बाजू ऐकून निर्णय देण्याचा आहे. असा आदेश अपिलास पात्र असेल. आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर दिवाणी न्यायालयात दाखल केलेला कोणताही दावा किंवा मुदतीत केलेले अपील असेल तर असे अपील. आदेश काढून टाकण्यासाठी दावा केलेला असेल किंवा मागितलेला अनुशेष आदेशासाठी विसंगत असेल तर काढून टाकता येईल. मात्र त्याबाबची नोटीस ही दिली पाहिजे.

कलम २१ नुसार जनतेच्या उपाययोजनेसाठी आवश्यक नसलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग यातील किंवा यावरील लोकांचे हक्कांबद्दलची माहिती देण्यात आली आहे. एखादा रस्ता, गल्ली किंवा मार्ग लोकांच्या उपयोगासाठी नाही असे जिल्हाधिकाऱ्यास वाटले तर तो तशी घोषणा करेल व त्या घोषणेत हक्क रद्द करण्याचे ठरविले आहे असे जाहीर करेल तशी नोटीस लवकरात लवकर देईल व त्या प्रस्तावावर हरकती मागेल. संबंधित व्यक्तीने अशी अधिसूचना जाहीर झाल्यापासून ९० दिवसांत हरकत घेण्याची आहे. (सदर कालावधीत योग्य कारणाकरिता जिल्हाधिकारी वाढ करू शकेल) संबंधित व्यक्तीला त्याची बाजू मांडण्याची संधी देऊन त्याची खाजगी जमीन आढळल्यास भूमी संपादन कायद्यानुसार नुकसानभरपाई देईल. त्या नुकसानभरपाई विरुद्ध संबंधित व्यक्तीस आयुक्ताकडे अपील करता येईल. आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल तथापि नुकसानभरपाई आदेशापासून सहा महिन्यांत दिली नाही तर त्यावर ६ टक्के दराने व्याज द्यावे लागेल.

कलम २२ नुसार भू-मापन चालू असताना भूमापन अधिकारी किंवा इतर वेळेस जिल्हाधिकारी विवक्षित जमिनी सार्वजनिक कारणासाठी एखाद्या गावास अभिहस्तांतरीत करेल. (सार्वजनिक म्हणजे गुरे चारण्यासाठी कुरण, स्मशानभूमी, गावठाणासाठी, छावणीसाठी, मळणीसाठी, बाजारासाठी, कातडी कमावण्यासाठी, रस्ते, कोल, उद्याने गटारे किंवा अन्य कोणतेही सार्वजनिक निकारण) अशा जमिनीचा वापर ज्या कारणासाठी अभिहस्तांतरण झाले आहे ते कारण सोडून अन्य कारणाकरीता जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

**क्रमश :**

# अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

**(मागील भागावरून पुढे..)**

मागील भागात आपण शुक्र आणि त्याच्याशी संबंधित आजार यांबाबत अल्पांशाने माहिती घेतली. पुढे आपण शनि या ग्रहासंदर्भात माहिती घेवुयात.




सूर्याभोवती सर्वात अतिशय मंद गतीने प्रदक्षिणा करणारा शनी ग्रह आहे. सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास शनीला तीस वर्षांचा कालावधी लागतो. भोवती आकर्षक कडे असणारा निळसर रंगाचा सुंदर, मनमोहक असा शनीग्रह आहे.वैज्ञानिकांच्या मतांनुसार इतर ग्रहांच्या तुलनेत शनी अधिक थंड आहे आणि हलका आहे. याचा व्यास साधारणतः १,४२,६७,२५,४०० किलोमीटर आहे. सूर्यापासून शनी साधारणतः ८८ कोटी ६० लाख मैलांच्या अंतरावर आहे.

वेद आणि पुराण यांच्या अनुसार सूर्य आणि सूर्याची द्वितीय पत्नी छाया यांचा शनि हा पुत्र आहे. सूर्यपुत्र या नात्याने शनी हा यम आणि कुबेर यांचा ज्येष्ठ बंधू आहे. म्हणून शनिला ' यमाग्रज ' म्हटले आहे. मृत्यूनंतर मानवाच्या पाप व पुण्याचा लेखाजोखा चित्रगुप्त ठेवत असतो आणि त्यानुसार शनि न्यायनिवाडा करीत असतो. शिक्षा भोगण्यासाठी शनी पाप्याला (आत्म्याला) यमाकडे पाठवतो तेथे यमयातना सोसाव्या लागतात. पुण्यवंताला सुखाचे पारितोषिक, मानसन्मान देण्यासाठी कुबेराकडे पाठवतो अशी धारणा आहे.

शनीला कालपुरुषाचे ' दुःख ' मानले गेले आहे. चिंता आणि व्याधीचा कारक शनी मानले गेले आहे तसेच न्याय आणि विवेकाचे कारकत्वही शनीकडे असल्याचे ज्योतिषशास्त्रात मानले जाते. माणसाच्या कर्तृत्वाची बरी अथवा वाईट फळे शनि आपल्या पणवतीच्या आणि साडेसातीच्या कालावधीत देत असतो. साडेसाती आणि पणवतीच्या कालावधीत माणसाच्या जीवनात प्राप्त नसलेले अपेक्षित प्राप्त होते तर प्राप्त असलेले क्षणात लयासही जाते. या कालावधीत शनि व्यक्तीला चिंता जशी देतो तसेच आत्मचिंतनातून, आध्यात्मिक चिंतनातून परमार्थ साधण्याची संधीही देत असतो.




यामुळे शनिग्रहाला, त्याच्या उपासनेला असामान्य महत्त्व आहे. साडेसातीबाबत आणि मंगळाबाबत कितीतरी गैरसमज पसरलेले आहेत तसेच शनिबाबतही आहेत. ज्योतिषशास्त्रात शनिची पणवती आणि साडेसाती त्याचप्रमाणे शनिच्या दशा यांना अत्यंत महत्त्व दिले जाते. नोकरी, सेवा यांच्या संदर्भात शनीचा विचार केला जातो.

शनि हा मकर आणि कुंभ या दोन राशींचा स्वामी आहे तर पुष्य, अनुराधा आणि उत्तराभाद्रपदा ही शनीची नक्षत्रे आहेत. एका राशीत शनी सुमारे अडीच वर्षे भ्रमण करतो. जन्म कुंडलीत शनि बलवान, उच्च राशीचा, शुभ योगात असेल तर लोकप्रियता, सार्वजनिक प्रसिद्धी, वाहनसौख्य, गृहसौख्य, विवाहयोग यांची आणि एकंदरीत समृद्धीची वाढ करतो. बऱ्या-वाईट यांच्या अनुभवातून शहाणपण, सुज्ञपण देतो. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांच्या सापेक्षतेने विचार करणारा शुद्धविवेक देतो. सत्कर्म, पुण्य करण्याची संधी देऊन जीवन उद्धरून मोक्षाकडे वाटचाल करण्याची संधी देतो. कलीकाळातील तंट्यात न्याय प्रदान करतो. अग्निदिव्यातून तावून-सुलाखून उजळवून कोंदण करतो. शारीरिक, मानसिक आणि आत्मिक कार्यक्षमता वाढवतो. साहस देतो. कार्यकुशल बनवतो. वैभवसंपन्न करतो.

शनि निर्बल, अशुभ योगात असता आपत्ती, दुःख, दीर्घकालीन आजार, रोग, शत्रुत्व, विश्वासघात, पती-पत्नीत दुरावा, वियोग, विवाह विच्छेद, वैधव्य, विधुरत्व, फसगत, बेबनाव, खोटे आरोप, निष्कारण बदनामी, अकारण शिक्षा, करावास, पोलिसांचा व न्यायालयीन खटल्यांचा उपद्रव, सर्वांगीण उपेक्षा, आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या घटना किंवा विचार, दारिद्र्य, अपयश, अपेक्षित फलप्राप्तीसाठी विलंब, चोरी होणे, हानी नुकसान होणे इत्यादींना सामोरे जावे लागते. दुर्बल व्याधी, पक्षाघात, संधिवात, वातविकार. नेत्ररोग, अवयवभंग, अपघात, दमा, गुप्तांगाच्या व्याधी, कुष्ठरोग, जखमा, कफजन्य विकार, न्युमोनिया, कमर वेदना (सायटिका) यांचा ससेमिरा मागे लागतो. अशावेळी ज्योतिषतज्ज्ञांकडून शनीबाबत कुंडलीचिकित्सा तसेच वैद्यकीय चिकित्सा करून घ्यावी. शनीची उपासना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने करावी.

**उर्वरित पुढील भागात.**

# स्वतः मेल्या शिवाय स्वर्ग दिसत नाही.



**चित्रा अविनाश नानिवडेकर. सफाळे.**

शाळेत शिकविलेल्या म्हणी ह्या फक्त पाठ करण्या साठीच नसतात. आपल्याला नेहमीच्या जीवनात ह्याचं प्रत्यन्तर येत असतं. आजी एखादी गोष्ट आणायला बाजारात पाठवत असे. बालसुलभ स्वभावानुसार बाजारातील एकेक गोष्टीं बघत बघत खूप उशिरा घरी पोहचले की आजी हटकून म्हणत असे "काय आणायला सांगितलं आणि काय आणलं हिने... खरंच स्वतः मेल्या शिवाय स्वर्ग दिसत नाही आता उद्या मलाच जाऊन आणायला लागणार "

मोठेपणी नोकरीं करत असताना ह्या म्हणीचा प्रत्यय तर नेहमीच येत असे. एकदा हॉस्पिटल सर्जिकल वॉर्ड मध्ये खूप नविन ॲडमिशन्स आली. कोणाला सलाईन लाव, कोणाच्या पोटातील पाणी काढण्याची तयारी कर, कोणाला रक्ताच्या चाचणी साठी तयार कर. अशी धावपळ चालू होती. नेमकी बरोबरची सिस्टर सुट्टीवर. दुसरं कोणीही मदतीला नाही. एक इंटर्न आणि मी. तशात नवीनच बदलून आलेली मदतनीस. वॉर्ड अटेंडन्ट आमच्या हॉस्पिटलला अनुकंपा तत्वावर आयाबाई म्हणून ह्या वॉर्ड अटेंडंटची नियुक्ती झाली होती. ह्यांना कामाचा काहीही अनुभव तर नसतोच. शिवाय ह्यानीं घराच्या चार भिंती पलीकडे काहीच जग पाहिलेलं नसतं...एरवी आम्ही नर्सेस ह्यांना सांभाळून घेतोच पण आजची गोष्ट वेगळी होती. मी एकटीच वॉर्ड मॅनेज करत होते.

इंटर्नने नविन भरती केलेल्या रुग्णाचे रक्ताचे नमुने पटापट घेतले...कोणाची युरीन टेस्ट तर कोणाचे स्टूल (शौच...ह्याला इंग्लिश मध्ये स्टूल म्हणतात.)सॅम्पल...असं सगळं एका ट्रे मध्ये ठेवलं. मी रुग्णाला सलाईन लावता लावता मावशीबाईला (अटेंडंट )सांगितलं "मावशी पटकन हे ब्लड, युरीन, स्टूल पॅथोलॉजिला नेऊन द्या.. पॅथोलॉजी माहितीये ना पहिला मजला 22 नं."

"व्हय जी.."म्हणाली. मी दुसऱ्या कामासाठी वळले.

पंधरा मिनिटात वॉर्डचा फोन टेबलावर वाजला. इंटर्नने घेतला. मी वॉर्डाच्या



शेवटच्या टोकावर. त्याने ओरडून सांगितलं "सिस्टर तुम्हाला फोन आहे" सलाईन लावता लावता मी पण ओरडून म्हटलं "निरोप काय ते विचारा...सलाईन लावतेय "

"तुम्हाला अर्जंट लॅब मध्ये बोलावलेय."

आमच्या क्षेत्राचे एक वैशिष्ट्य आहे. कोणाचीही चुकी असली तरी जबाबदारी सिस्टरवर टाकायची.

मी इंटर्न डॉक्टर ला वॉर्ड कडे लक्ष द्यायला सांगून झक्कत लॅब मध्ये गेले..

तिकडे वेगळाच प्रकार सिनियर टेक्निशन, लॅब चा सगळा स्टाफ आणि मध्ये आमच्या वॉर्डातल्या मावशी...मी धसकून पाहिलं ह्यांनी सगळे सॅम्पल्स सांडवले की काय?

मला पाहताच सिनियर जोरात हसत म्हणाले "सिस्टर तुमच्या मावशीने बघा स्टूल सॅम्पल म्हणून डोक्यावरून काय आणलं...हा वॉर्डातला स्टूल"

माझी पण हसून मुरकुंडी वळली...पण बिचारी मावशी निरागस पणे म्हणाली "सिस्टरणी तुनीच सांगितलं ना स्टूल घेऊन जा संगती?"

माझ्या मनात आलं खरंच प्रत्येक गोष्टीत स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही...मी मावशींच्या हातात सगळ्या सॅम्पल्स द्यायला पाहिजे होतं.

आहे ना गम्मत...!!

# सरकारी योजना/नोकरी

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा

**बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारून विहिरी, शेततळे, वीज जोडणी आदींसाठी भरीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सुधारित निर्णयानुसार नवीन सिंचन विहिरीस 4 लाखांपर्यंत तर जुन्या विहिरींच्या दुरुस्तीस 1 लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल.**

पूर्वी हे अनुदान अनुक्रमे अडीच लाख आणि पन्नास हजार एवढे होते. इनवेल बोअरिंगसाठी आता 40 हजार तसेच यंत्रसामुग्रीसाठी 50 हजार रुपये आणि परसबागेकरिता 5 हजार देण्यात येईल. नवीन विहिरींबाबत 12 मीटर खोलींची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच दोन सिंचन विहिरींमधील 500 फूट अंतराची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी सध्या 1 लाख रुपये अनुदान देण्यात येते आता ते प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के किंवा 2 लाख यापैकी जे कमी असेल ते देण्यात येईल. त्याच प्रमाणे तुषार सिंचनासाठी सध्या 25 हजार रुपये देण्यात येतात. आता तुषार सिंचन संच 47 हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के अनुदानापैकी जे कमी असे ते अनुदान देण्यात येईल. अशाच प्रमाणे ठिबक सिंचन संचासाठी 97 हजार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्क्यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येईल.

याशिवाय इतरही अनेक निकषांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत घटकांचे आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे
या योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ व निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण**

प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.2 लाख यापैकी जे कमी असेल ते.इनवेल बोअरिंगसाठी 40 हजार रुपये,वीज जोडणी आकारासाठी 20,000 किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते .विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिनसाठी 10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000 यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईपसाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 100% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते .

**सूक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी**

प्रचलित आर्थिक मापदंडान्वये तुषार सिंचन संच-रू.47,000/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.
ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडान्वये ठिबक सिंचन संच-रू.97,000/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 15% किंवा रू. 47,000/- यापैकी जे कमी असेल ते.
ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 15% किंवा रू. 97,000/- यापैकी जे कमी असेल ते.यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) साठी 50 हजार रुपये.परसबागेसाठी पाच हजार रुपये.

त्याचप्रमाणे या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.1,50,000 वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे.या योजनेंतर्गत यंत्रसामग्री (बैलचलित / ट्रॅक्टरचलित अवजारे) ही नवीन बाब समाविष्ट करण्यात आली आहे.नवीन विहीरीबाबत रू. 4 लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, 12 मीटर खोलीची अट रद्द करण्यात आली आहे.महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम 1993 च्या कलम 3 नुसार अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये, यास मान्यता देण्यात आली आहे. ही योजना अनुसूचित जमातीच्या लाभ धारकांसाठीच राबविण्यात येत असल्याने, दोन सिंचन विहिरींमधील 500 फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे.

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थीस 20 वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ देण्यात यावा. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकासाठी प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.2 लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्याची तरतूद करावी. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांना देखील देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती किंवा शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देय राहील.

अ) नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 6,42,०००/ किंवा रु. 6,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर- रु.4,00,000+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री-रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 6,42,000/किंवा रु. 6,92,000)

आ)जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जूनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु 3,42,०००/ किंवा रु 3,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जूनी विहीर दुरुस्ती- रु.1,००,०००+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 3,42,000/किंवा रु. 3,92,000)

इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 4,०2,०००/किंवा रु. 4,52,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण – रु.2,००,००० + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 4,02,000/किंवा रु. 4,52,000).



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

**आठवणींच्या गोष्टी**

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# काव्यातून लोकभावना लिहिणारे कवी गोपचंद रूके



कवी गोपचंद रूके

रत्नागिरी जिल्हातील दापोली तालुक्यातील बोंडीवली हे कविवर्य गोपचंद धोंडू रूके यांचं मुळगाव. आईच नावं सखूबाई.१९२८ सालातील या कवींचा जन्म. पाच बहिणी आणि काशीराम, गोपचांद हे दोन भाऊ. बहिणी वयाने मोठ्या. वडील धोंडू हे गिरणी कामगार. मुंबईत डिलाईल रोड बी. डी. डी. चाळीत स्वातंत्र्य पूर्व काळात वडिलांनी केवळ अकराशे रुपयात रूम घेतला. वडिलांनी गावावरून कुटूंब मुंबईत आणल. सात मुलांसह दहा बारा जणांचं एकत्रित कुटूंब . जेमतेम दुसरी शिक्षणं घेतलेल्या या कवीचं अक्षर सुबक वळणदार होत. वाचनाचं वेड होतच . स्वातंत्र्य चळवळ त्यांचं बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक परिवर्तन साठी उभारलेला लढा याचा योग्य अभ्यास , निरीक्षण करून पोटासाठी पेस्ट कंट्रोलमध्ये नोकरी करत असताना त्यांनीं आपला कला छंद जोपासला. त्यात त्यांनी गायना बरोबरच स्वतः गीत रचना करू लागले . धम्म दिक्षा सोहळ्या आधी विविध ठिकाणीं जनजागृती प्रबोधनसाठी स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे कार्यकर्ते सभा घेतं या सभेआधी कलावंत आपली गीते सादर करीत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक चळवळ जोमाने सुरू होतीच. मुंबईत, मुंबई बाहेर स्वतः बाबासाहेब सभा घेतं अशीच एक सभा त्यांनी मुंबईत नरेपार्क मैदानात आयोजित केली होती. हजारोंचा जनसमुदाय जमला होता. त्यासभेआधी श्रावणदादा यशवंते, कवी राजानंद गडपायले, वामनदादा कर्डक यांच्यासह तत्कालिन दिग्गज कलावंतांनी गीते सादर केली अठरा वीस वर्षाच्या गोपचंद रुकेना तिथं गीतगायनाची संधी मिळाली. या कवीचं सतभाग्य असं की त्यांचं गीत गायन सुरु असताना सभेच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं आगमन झाले. कार्यकर्त्यांनी गीत गायन कार्यक्रम थांबवला. विचारमंचावर जाता जाता या कविगायकाच्या गीतांचे शब्द नी आवाज बाबासाहेबांनी ऐकला होता. सभेमध्यें बाबासाहेबांचं भाषणं संपताच त्यांनी कार्यकर्त्यांना विचारलं मी येता येता जो मुलगा गात होता त्याला पुढे बोलवा. लाजत घाबरत हा कलावंत बाबासाहेबांच्या चरणाशी जावून वाकला. बाबासाहेबांनी तू छान गात होतास, आवाजही पहाडी आहे म्हणाले. पाठीवर कौतुकाची थाप मारलीच आणि शुभेच्छापर चार ओळी लिहून सही करून ते सर्टिफिकेट या कलावंताच्या हातात दिले. स्टेजवरील सर्व कलावंताच कौतुक करताना बाबासाहेब म्हणाले माझी दहा भाषणं नी या सर्व कलावंताचे एक गाणं समाजांत जागृतीस पात्र आहेत. बाबासाहेबांच्या या कौतुकाने अशा अनेक कलावंतांना ऊर्जा मिळाली त्यापैकी कवी गोपचंद रूके हे एक आहेत.

उभ आयुष्य समाज जागृतीसाठी जगले. कुणाची खोटी स्तुती केली नाही. निर्भिडपणे लिहिलं नी गायलं सुध्दा. संपूर्ण महाराष्ट्रात त्याच्या गायन पार्टीच्या ७७१ शाखा म्हणजे त्यांची गाणी गाणारे सातशे एक्काहत्तर एवढे गायक होते. या कवींनी तत्कालिन नामवंत गायक गायिका सोबत गायन मुकाबले रंगविले . अन्याय अत्याचार रूढी परंपरा या विरूद्धआणि प्रसंगी तत्कालिन राज्यकर्ते शासन विरोधात लिहिलं गायल. आणींबाणी काळात अटक झालेला हा कलावंत स्वाभिमानाने जगाला.

**"बाळ्या पाजवर कोयता**
**थांब थांब बाळ्या पाजवतोय कोयता"**

हे लोकगीत सादर करतांना लाकडाचा कोयता त्यावर चांदीची बेगड लावून स्टेजवर साभिनय गीत सादर करीत. हे गीत चाळीस वर्षांपूर्वी नमन तमाशात वगनाट्य मधी अनेकांनी सादर केलेल मी पाहिलं ऐकलं आहे. गायक शंकर म्हात्रे यांची बहीण वत्सला यांच्या सोबत त्यांचा १९६४ ला विवाह झाला. पाच मुली आणि जयकांत हा मुलगा या मुलाचं १९९९ ला निधन झालं. रुकेंची गीते श्रीवर्धन दांडगुरी गावचे प्रकाश खैरे,पणदेरीचे हिरामण साळवी बहिरवलीचे तुकाराम तांबे, शिवचे शिवदास मोहिते, आपेडेचे राजाराम सोनावणे आणि आंबयेचे सुपुत्र प्रख्यात गायक जनार्दन धोत्रे आणि त्यांचे पुतणे अरविंद रुके यांच्या वाणीतून या कवीची काही गीते ऐकली आहेत. गीत गाऊन अभिनय करणारे प्रख्यात गायक गोविंदराव म्हशिलकर हे रूकेचें आतेभाऊ होते .दोघांचा गीत गायन सामना ऐकायला रसिक तुफान गर्दी करीत असत. असंख्य गाणी लिहिणारे असे अनेक आहेत त्यातीलच एक कविवर्य रुकें.त्याच्या असंख्य गीतातील काही गीते.

**"ही जन्मभूमी श्री बुद्धाची**
**प्रिय प्राणाहून सर्व जगाची**
**थोरवी तिची मी गाऊ किती**
**कास धरुनीया बौद्ध धम्माची "**

**"आहे सीमेवर सुरू ही लढाई**
**येणं माझ्र होणारं नाही**
**नको पाहू वाट माझी आई "**

आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभेत त्यांच्या उपस्थितीत गायलेले गीत

**"भिमराया तुझे नावं गाजले**
**साऱ्या भूवर नगारे वाजले "**
**पाहून सारे लाजले**
**तू पाणी तयांना पाजले"**

**"बाजारात विष आणि गव्हात भेसळ**
**तांदळात मिळतात खड**
**"**

**"दिस माथ्यावर आला पहाना**
**वाट पाही शिवाराचा राणा**
**सांगा ती अजून कशी येईना**
**या मल्यामधी ठुमकत ठुमकत माझी मैना "**

माझ्या बालपणी शेतात काम करतांना किंवा अन्य ठिकाणी ऐकलेल गीत जे मला खूप आवडतं

**"वर पाहून देखणा**
**दिलीस कोकणा**
**कशी ग पाडलीस**
**मला फशी**
**कोकणच्या या आडदांड वाटा**
**आई मी रस्त्याने चालू किती "**

कवी कलावंत या जगातून देहाने जातात पणं त्यांची वाणी, लेखणी अजरामर राहते. माझे वडील, आणि चुलते हे मुंबईत नायगाव, दादर सायन परिसरात राहतं होते अशा जुन्या कलावंतांचे ते चाहते होते. त्यांच्याशी ओळख होती. अनेकांची नावं गाणी त्यांच्या कडून ऐकली त्यातीलच एक नावं कविवर्य गोपचंद रूके . एक जुलै १९८६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला . साधी सरळ लेखणी मनाला भावणारी अंतःकरण हेलावणारी गाणी लिहिणाऱ्या या रसिकमान्य लोक कलावंताच्या स्मृतींस विनम्र अभिवादन.




# खरंच..... स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही!

**सुखदा सयाजीराव गोरड,**
**दापोली**

"बाई काय हे ऊन,
नक्कोस झालय अगदी."वैतागलेल्या सुरात सुमन पुटपुटत होती आणि निघाली होती..... स्वतः ला काय होतंय ते दवाखान्यात बघायला .तिथे डॉक्टरांनी तिचे म्हणणे ऐकून घेतले, तपासले नि भली मोठ्ठी यादी दिली. पंधरा एक तपासणयांची. आधीच ती भित्री......नि भीत्या पाठी ब्रह्मराक्षस!मग काय पटापट सर्व टेस्ट करुन तब्बल तीन तासांनी ती आली व डॉक्टरांना परत भेटली. दोन दिवसांत सर्व टेस्टचे रिपोर्ट मिळाले की या असे डॉक्टरांनी सांगितले. दोन दिवस अगदी तर्क कुतर्कामध्येच कसे गेले तिला कळलेच नाही. मात्र तिचे मन कशातच लागत नव्हते, भीतीने तिची अगदी गाळणच उडाली होती. रिपोर्ट बघून डॉक्टरांनी बायोप्सी नि मॅमोगाफी करायला सांगितले, दिलासा दिला,"घाबरु नका सर्व काही ठीक होईल. आता आठवडाभरात तुम्हाला कॅन्सर आहे की नाही ते कळेल आणि असलाच तर आपण छान उपचार सुरू करु.ओके!"

घरी आल्यावर परत तीच अवस्था.आठवडाभर नुसती जीवाची तगमग आणि तळमळ. चित्त नाही थाऱ्यावर...सारखी टांगती तलवार! रिपोर्ट मिळाले हे कळल्यावर तिने पटकन धाव घेतली दवाखान्याकडे. कधी एकदाचे डॉ.बोलावतायत नि मी पॉझिटिव्ह नाही असे सांगताहेत असे तिला झाले होते. ती आतुरतेने वाट बघत होती. तिचा नंबर येण्याची. नर्सने हाक मारल्यावर ती तंद्रीतून बाहेर आली आणि आत गेली तंद्रीतून बाहेर आली आणि आत गेली. डॉक्टर बसा म्हणाले, "तुमच्या बरोबर कोणी आले नाही का?तुमचे रिपोर्ट पॉझिटिव्ह आहेत, तुम्ही सेकंड स्टेजला आहात. उपचारामध्ये सातत्य ठेवले तर तुम्ही लवकरात लवकर बऱ्या व्हाल".हे सर्व कानात जीव एकवटून ऐकणाऱ्या सुमनला खूप अवघड, दुःखदायी वाटत होते आणि अश्रूंचा बांध फूटून ते डोळ्यांतून वाहत होते,पाया खालची जमिन सरकल्याने ती अगदीच हवालदील झाली होती आणि.....

विमनस्क मनस्थितीत ते सर्व ऐकताना तिला डोळ्यासमोर तिची गोड निष्पाप मुलगी दिसत होती.काय करावे, कुठे पळावे, उपचारासाठी पैशांची तजवीज कशी करावी, कुणाला सोबत आणावे,असे असंख्य प्रश्न आवासून तिच्या समोर उभे होते.ती बघत होती अगदीच हतबल होऊन.पण.....लगेचच तिने डोळे पुसले, डॉक्टरांचे आभार मानले नि कर्ज काढण्यासाठी ती बँकेत गेली, कागदपत्रे, सह्या सारेकाही दोन दिवसांत आटोपले. सर्जरीचा दिवस ठरला,आई वडील,पती हे सर्व वारलेले असल्यामुळे, कागदपत्रांवर कोण सही करणार इथपासून प्रश्न निर्माण झाला.दवाखान्यात मैत्रिण आली बहिण म्हणून सही करायला.तिच सतरा वर्षांच लेकरु कावरीबावरी होऊन...ती आईकडे बघत होती, रडत होती, स्वतः चे अश्रू आईपासून लपवत होती. आईला आय सी यु मध्ये नेले, तीन तासांनी आईला बघायला या, आता बाहेर थांबा..असे सांगण्यात आले.तिला भूल दिली होती, ती निपचित पडली होती...पण तीन तास उलटून गेले तरीही माझी आई अजून कशी बाहेर आली नाही म्हणून तिच्या लेकिने आकाश पाताळ एक केले होते.ती येरझाऱ्या घालतं येणाऱ्या जाणाऱ्या नर्स व डॉक्टरांना विचारत होती आई कधी बाहेर येणार.तेव्हा नर्स म्हणाली,"डोन्ट वरी, अजून दोन तास लागतील, लगेचच पॅनिक होऊ नका.बसा बाहेर, बोलवते नंतर." मुलगी जास्तच गोंधळली,धायमोकलून रडू लागली, डोळे सुजले, लाल झाले, अश्रू पुसून, नाकं पुसून सर्वच लालेलाल झाले! आईला ओटी मधून बाहेर आणल्यावर लेकीची कळी खुलली!

आईला शुद्ध येईतो लेक तिच्याकडे बघत होती, डोक्यावरून हात फिरवत होती,तिचा हात घट्ट धरत होती मनातून गणपती बाप्पाला आळवत होती.... आणि आई शुद्धीवर आली आहे हे पाहून सुखावली होती. नर्सने दिलेल्या परचीची औषधे घेऊन आली होती... अगदी वायू वेगाने!

आई भानावर आली होती, तिला ओकावेसे वाटत होते, म्हणून ओमेटींग साठी पॉट घेऊन साश्रू ती आईला मदत करत होती, तिची पाठ चोळत होती, डोकं दाबत होती.एवढेसे लेकरु आता आईची आई झाले होते.!....तर मग काय,आईची आता वाघीणच झाली होती. लेक जिवापाड काळजी घेत होती, पुढे केमो, रेडिएशन यांमुळे महत्वाचे इयत्ता बारावी चे वर्ष वाया गेले होते..... तरीही मुलगी डोळ्यात तेल घालून, आईची सेवा करत होती, काळजाच्या तुकड्यांप्रमाणे आईला जपण्यासाठी तिने जीवाचे रान केले होते.तिचा त्याग व अथक परिश्रम यांच्या बळावर आईने या जर्जर करणाऱ्या जीवघेण्या रोगावर मात केलेली होती.घरी भेटायला आलेल्यांना, येणाऱ्यांना सुमन अभिमानाने सांगत होती, लेकीची थोरवी!दोघींनी भोगलेल्या नरक यातना आठवून ती आपसूकच म्हणायची,"खरंच मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही!"

# आय लव्ह डाळपस्वारी!

## मालवणी बोली



**वयल्यांचा कवग्या,**
**मालवण- सिंधुदुर्ग.**

परवाच्या दिसा मी ह्यांका म्हटलय उद्यापासून देवांची डाळपस्वारी सुरु व्हताहा तेव्हा गावाक जावया चला. पण ह्यं म्हणाले, नाय गो जमाचा. सध्या सुट्टी नाय मिळाची. सध्या आमचे स्पोर्ट्स सुरु असत. ते आता ऐन रंगात इलेहत. पोरांचो सराव घेतलोहा. त्येंची चमकाची हीच वेळ आसा. पोरांच्या पाठी उभ्या ऱ्हवाक व्हया. सध्या जो तो आपलोच झेंडो फुडे न्हेवक टपललो आसा. कायतरी पार्सिलीटी करतीत नि आमचे पोर मागे पडतीत. स्पोर्ट्स झाल्यावर लगेच नासा-इस्रोची परीक्षा. ती पण तेवढीच महत्वाची. त्यात करून परत मंथ एन्ड. कसा गो जमतला......? नायच जमाचा. आवशीक सांगान टाक, फुडच्या महिन्यात येतव, नव्या वर्षात.

नोकरी म्हटल्यावर कामा काय रोजचीच आसत. कामा कधी काय संपलीहत? ह्या काम निपाटला की फुडचा काम तयारच असता. पण गावची देवांची डाळपस्वारी वरसातना एकदाच येता. डाळपस्वारीक जावक व्हया. देवांक आपल्या मटयेत आणूक व्हये. देवांची सेवाचाकरी करूक व्हयी. दर वरसाची रखवालेची ओटी भरूक व्हयी.

गाव घर इसरान चलाचा नाय. आपली मटी आपली वाट बघीत असता. आपली लेकरा, वेलीवरची फळा आपल्या मटयेत इल्यावर तिका बरा वाटता. लेकरांनी घर भरला काय मटी हसता, खुलता. गावच्या लोकांक बरा वाटता. ती म्हणतत, पोटापाणयासाठी भायर गेले पण देवाधर्माक विसारले नाय. देवाच्या वार्षिकाक धावत इले. देवानच त्येंका आणल्यान. गावात तरी आतासा ऱ्हवता कोण? सगळी माणसा पोटाच्या पाठी मुंबैक गेलली. आणि गावात ऱ्हवान तरी करतली काय ओ? गावात पोटापाणयाचो मार्ग नाय की कसलो नोकरी धंदो नाय.

माझा एवढा पुराण ऐकल्यावर ह्येंचा पण मन बदलला. कागदावर कसली तरी आकडेमोड करीत ते माका म्हणाले, जावया गावाक. रजेचो अर्ज लिवन पाठवतय. नाय म्हटला तरी बाकीचे आसत. ते करतीत. आणि कामा काय रोजचीच आसत. बॅगो भरूक घे. उद्याच सकाळच्या दिवा गाडयेत बसाया. पोरांचीय तयारी कर.

आम्ही सांचे पाचच्या सुमारास गावात पोचलव. गावात उतरल्यावरच डाळपस्वारीच्या ढोलांचे आवाज कानावर पडले. ताशांचे, आटमबारांचे आवाज कानांवर पडले. देवांची स्वारी रामेश्वराच्या देवळाकडसून आकारी बिरामणाच्या देवळाकडे चलली व्हती. वाटेतली पडस्तळा,



ओटये घेत घेत फुडे जाय व्हती. आमची रीक्षा पांदीत शिरली तर काय इचारतास, आमच्या सामकी देवांची स्वारी! ढोल, ताशांचो गजर, सनईचो सूर, पाचय शिवकळा वदत व्हते. पाचय तरंग ऐन रंगात इले व्हते. वदणारे, वाढलेले, खांबकाठी गरगर फिरवणणारे, हातांच्या बोटांवर नाचवणारे शिवकळा बघून माझ्या तर बाय डोळ्यांचा पारणाच फिटला.

अगे बाय, मी असा बोलत काय बसलय? आता आमची रीक्षा घरासमोर थांबलीहा. आकाड्यावर उतारतव आता. आकाडो वलांडलव काय, शिदे घरात. आता आकाडो काढूक व्हयो. देव घरात आणूक व्हये. देवांचो जागो सारवून लख्ख करूक व्हयो. रांगोळी काढूक व्हयी. घरदार झाडूक व्हया. चला बाय, ढीगांनी कामा पडलीहत. उद्या सकाळी देवांची डाळपस्वारी आमच्या पाणंदीतसून जातली. देव आमच्या घरात येतले. रयत आमच्या घरात येतली. आमच्या हातान देवांची सेवाचाकरी घडतली. देव वदतले. मज्जा मज्जा येतली! आय लव्ह डाळपस्वारी!!





# बाजरीचे थालीपीठ



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**बाजरी ही पोषणमूल्यांनी परिपूर्ण असलेली पारंपरिक धान्य आहे. हिवाळ्यातील गरमागरम बाजरीचे पदार्थ खाल्ले तर शरीराला ऊर्जा मिळते. बाजरीचे थालीपीठ हा एक पौष्टिक आणि चविष्ट प्रकार आहे. आज आपण बाजरीचे थालीपीठ पाहूया आणि चाखूया**

**साहित्य :**

- **बाजरीचे पीठ – २ कप**
- **कांदा (बारीक चिरलेला) – १ मध्यम आकाराचा**
- **हिरवी मिरची (बारीक चिरलेली) – २-३**
- **जिरे – १ टीस्पून**
- **हळद – १/२ टीस्पून**
- **मीठ – चवीनुसार**
- **कोथिंबीर (बारीक चिरलेली) – २ टेबलस्पून**
- **लसूण (बारीक चिरलेला किंवा वाटलेला) – २-३ पाकळ्या**
- **गरम पाणी – थालीपीठ भिजवण्यासाठी**
- **तेल – थालीपीठ भाजण्यासाठी**

**कृती:**

1. **पीठ मळणे:**
2. **एका मोठ्या भांड्यात बाजरीचे पीठ घ्या.**
3. **त्यात चिरलेला कांदा, हिरवी मिरची, जिरे, हळद, मीठ, कोथिंबीर, आणि लसूण घाला.**
4. **हे मिश्रण नीट एकत्र करा.**
5. **गरम पाणी हळूहळू घालत भिजवून घट्टसर पीठ मळून घ्या.**
6. **थालीपीठ तयार करणे: गॅसवर तवा गरम करत ठेवा.**
7. **पिठाचा एक गोळा घेऊन प्लास्टिक पेपर किंवा भिजवलेल्या कापडावर ठेवा.**
8. **हलक्या हाताने थापून गोलसर थालीपीठ तयार करा. थालीपीठाला मधोमध एक छिद्र करा, ज्यामुळे भाजताना तेल व्यवस्थित पसरेल.**
9. **थालीपीठ भाजणे:**
10. **गरम तव्यावर थालीपीठ हलक्या हाताने ठेवा.**
11. **थालीपीठाच्या कडांवर आणि मधल्या छिद्रात थोडेसे तेल घाला.**
12. **एका बाजूने खरपूस भाजून घ्या, मग पलटून दुसऱ्या बाजूनेही भाजा.**
13. **सर्व्हिंग:**
14. **गरमागरम थालीपीठ लोण्यासोबत, दही किंवा ठेच्यासोबत सर्व्ह करा.**
15. **टीप:**
16. **थालीपीठ अधिक चविष्ट बनवण्यासाठी त्यात मध्ये फायबर, प्रथिने आणि लोह विपुल प्रमाणात असते, जे पचनास मदत करते आणि हिवाळ्यात शरीर उबदार ठेवते.**
17. **हृदयासाठी उपयुक्त आणि वजन कमी करण्यासाठीही फायदेशीर.**
18. **चविष्ट आणि पोषणमूल्यांनी भरलेले बाजरीचे थालीपीठ घरच्यांसाठी नक्की करून पाहा! 😊**

# विमा समस्येची समज आणि गरज

( पान १वरून )

विमाधारक काय करू शकतात?

१. आपली पॉलिसी समजून घ्या

- पॉलिसी कागदपत्र नीट वाचा आणि स्वाक्षरी करण्यापूर्वी प्रश्न विचारले.
- अस्पष्ट अटींबाबत स्पष्टीकरण मिळवा.

२. दस्तऐवज तयार ठेवा

- संवाद, पेमेंट्स आणि दाव्याशी संबंधित दस्तऐवजांचे तपशीलवार रेकॉर्ड ठेवा.
- प्रक्रियात्मक विलंब टाळण्यासाठी पूर्ण आणि अचूक माहिती सबमिट करा.

३. गरज असल्यास पुढे जा

- जर तुमचा दावा नाकारला गेला तर, वरिष्ठ व्यवस्थापन किंवा विमा कंपनीच्या तक्रार सेलकडे तक्रार करा.
- गरज भासल्यास विमा लोकपाल किंवा ग्राहक न्यायालयाकडे जा.

४. शांत आणि चिकाटीने राहा

- निराशेतून टोकाची पावले उचलण्याचे टाळा. समर्थनासाठी कायदेशीर सल्ला किंवा वकील गटांचा शोध घ्या.
- सोशल मीडियाचा आणि सार्वजनिक मंचांचा उपयोग करून तक्रारी हायलाइट करा आणि निराकरण मिळवा.

**कारवाईचे आवाहन**

या प्रकरणातील दुर्दैवी जीवितहानीने विमा क्षेत्रातील प्रणालीगत बदलाची तातडी अधोरेखित केली आहे. भूतकाळ बदलण्यासाठी कोणतेही सुधारणा पुरेशा ठरणार नाहीत, परंतु अशा घटना पुन्हा कधीही होणार नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. विमा कंपन्यांनी नैतिक प्रथा आणि ग्राहकांचे समाधान यांना प्राधान्य दिले पाहिजे, त्यांच्या नफ्याच्या गरजेला त्यांच्या सेवा देण्याच्या जबाबदारीशी संतुलित केले पाहिजे. विमाधारकांसाठी, जागरूकता आणि सतर्कता यामध्ये मुख्य आहे. आपल्या हक्कांची जाणीव ठेवून आणि विमा कंपन्यांना जबाबदार धरून, तुम्ही आत्मविश्वास आणि मन:शांतीसह विम्याच्या गुंतागुंतीतून मार्ग काढू शकता.

**एकत्रितपणे, आपण अशा विमा प्रणालीसाठी काम करू शकतो जी खरोखरच संरक्षण आणि समर्थनाच्या तिच्या वचनाला पूर्तता करते.**

# मेळेकरीण

श्रीमहालक्ष्मी व्रतासोबत महाकालीची उपासनाही आवश्यक !

सध्या मार्गशीर्ष महिना सुरु आहे. या महिन्यातील गुरुवारी बहुतांश महिला श्री महालक्ष्मी व्रत करतात. या दिवशी दिवसभर उपवास केला जातो. चौरंगावर श्री महालक्ष्मीच्या रूपाने कलश मांडून तिची मनोभावे पूजा केली जाते. सुगंधी फुलांचा गजरा किंवा वेणी माळली जाते. देवीसमोर श्री महालक्ष्मी व्रताची कथा आणि महती महिती यांचे वाचन केले जाते. देवीची आरती केल्यावर देवीला पाच फळांचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या काही वर्षांपासून पूजेच्या कलशावर देवीचा मुखवटा लावून त्यावर वस्त्र आणि दागिने यांची सजावट करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. अनेक महिला हौस म्हणून पूजेच्या चौरंगाभोवती आकर्षक फुलांची सजावट करतात, दाराबाहेर रांगोळी काढून दारात पणत्या लावतात. नैवेद्यासाठी गोडधोड बनवतात. महाराष्ट्रात बहुतांश प्रांतात महिला हे व्रत करत असून वर्षागणिक व्रत करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढच होत आहे. शहरासारख्या ठिकाणी नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलाही वेळात वेळ काढून हे व्रत करतात. येणारा गुरुवार हा मार्गशीर्ष महिन्यातील अखेरचा गुरुवार असणार आहे. या दिवशी महालक्ष्मी व्रताचे उद्यापन केले जाते त्यानिमित्ताने सवाष्ण महिलांना वाण, गजरा अथवा फुल आणि हळद कंकू दिले जाते. श्री महालक्ष्मी देवीप्रती असलेली श्रद्धा याबरोबरच महालक्ष्मी देवीची कृपा आपल्या कुटुंबावर सदैव राहावी हा सकाम हेतूही या व्रतामागे दडलेला असतो.

शालेय जीवनात ज्ञानार्जन करून आपण श्री सरस्वती देवीची उपासना करत असतो. अनेक महिला आज उच्च शिक्षण घेऊन न्याय, वैद्यक, संशोधन, सैन्य, पोलीस आदी सर्वच क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. उद्योजक क्षेत्रातही अनेक महिलांनी आज उत्तुंग भरारी घेतली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढू लागला आहे. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान घेऊन त्यामध्ये पारंगत होणे ही श्री सरस्वती देवीची उपासनाच आहे. शक्तीची अर्थात देवीची तीन प्रमुख रूपे आहेत. त्यांतील श्री सरस्वती आणि श्री महालक्ष्मी या देवीच्या तारक रूपाची उपासना आपण प्रत्येक जण करत आपापल्या परीने करत असतो; मात्र देवीच्या ज्या रूपाच्या उपासनेची आज नितांत आवश्यकता आहे त्या भक्तांच्या उद्धारासाठी दृष्टांचा संहार करणाऱ्या महाकालीची उपासना महिलावर्ग केव्हा करणार आहे ? सध्याची देशाची आणि समाजाची स्थिती पाहता कोणत्याच क्षेत्रात महिला सुरक्षित नाहीत. स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये वर्षागणिक कमालीची वाढ होऊ लागली आहे. शहर असो वा खेडे, गरीब असो वा श्रीमंत, शाळकरी कन्या असो वा वयोवृद्धा वासनांधांच्या विखारी नजरांपासून आज कोणीच सुरक्षित नाहीत, दर मिनिटागणिक देशात कुठल्या ना कुठल्या ठिकाणची स्त्री आज अत्याचाराला बळी पडू लागली आहे. स्त्री अत्याचारावर अंकुश आणण्यासाठी कठोर कायदे करूनही या घटनांमध्ये घट झालेली नाही. स्त्रीने आर्थिक दृष्ट्या सबळ व्हावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली मात्र महिलांच्या सुरक्षेसाठी शासन राबवत असलेल्या योजना केवळ नावाला शिल्लक असल्याने स्त्री अत्याचाराचा आलेख

www.sindhudurgsamachar.in

# काव्यांगण

## वाट

अर्ध्या रात्री कधी तरी
असेच उठून तडक चालू लागावे
जंगलाच्या गर्द वाटेने
एकटेच...

वाट

बऱ्याच भेटतील
वृक्षवल्ली,वाटा,पायवाटा,रानवाटा वगैरे
तरीही चालतच रहावे
भणंग फकिरागत
फाटकी झोळी तशीच टाकून
सोडावा सुस्कारा

पुन्हा कुठल्यातरी ढिम्म काळोखात
अर्घ्य टाकावेत
जीर्ण वस्त्रांचे दान
उघड्या नागड्या भूमिला
आणि मग...

कुठल्याशा वृक्षाखाली
होत जावे या निबीड अरण्याचे बीज
पुन्हा नविन जंगल मात्र
उगवू देऊ नये
.
.
कोरत रहावे त्या बीजालाच
सूर्योदयापर्यंत
या बीजाचेच अर्ध्य देऊन
होत जावे

सूर्य कोटी समप्रभ

**सुदेश मालवणकर,**
**दापोली**

## नवदृष्टी ..!

भिंतीवरील कॅलेंडरला आज वर्ष पूर्ण झालं,
जुनं जाऊन भिंतीवरती कॅलेंडर नवीन आलं !
महिन्यागणिक कॅलेंडरची पानं उलटत गेली,
दिवसागणिक माणसांची मनं पालटत गेली !

भिंतीवरील निर्जीव खिळा होता कॅलेंडर धरून,
पानं जशी पलटत गेली; तसं वर्षही गेलं सरून !
जुनं गेलं, नवं आलं; पण खिळ्याला फरक नाही,
सारखं वजन दोहोंचंही काही नवलच उरलं नाही !

जुन्या कॅलेंडरची झाली आज काळानुसार रद्दी,
अवतीभवती माणसांचीही झाली नुसती गर्दी !
वार बदलत गेला तरीही दिवस सदा तोच होता,
तारखांच्या चौकटींतही रोजसमान जाच होता !

रोजच येत गेले नव्याने अनुभव गोड नि कटू,
जसे आचार नि विचार; तसेच लागलेही भेटू !
कॅलेंडर बदललं तरीही आयुष्य बदललं नाही,
संपलं वर्ष एक जरी, तरी जीवन संपलं नाही !

जगावा हर दिवस नवा वर्षाची सुरुवात मानून,
वाट का पाहावी नववर्षाची नवं कॅलेंडर टांगून !
टांगलं कॅलेंडर म्हणजे आयुष्यही टांगतं होतं,
तारखांनुसार चालताना जीवनही रांगतं होतं !

म्हणून टांगू नका भिंतीवर कॅलेंडर नववर्षाचे,
जुन्याकडेच नव्याने पाहा होईल जीवन हर्षाचे !
याच नवदृष्टीतून बघा होईलही बचत अल्प
चला, करूया नवदृष्टीतून नवीन हा संकल्प !

**राज भिंगारे,**
**रत्नागिरी**

## नव संकल्प

करूया मित्रांनो
एक नव संकल्प ,
या नववर्ष दिनी
आपण,मिळूनी सारे..!

मैत्रीचे बंध
जपूया सारे,
परस्परातील वैर
संपवूया,मिळूनी सारे..!

दीन दलितांना,
देऊया हात सारे,
जाती धर्मातील भिंती
पाडूया,मिळूनी सारे..!

संकट समयी
देऊया हात मदतीचा,
त्या बळीराजाला
आपण,मिळूनी सारे...!

करूया मुकाबला
त्या देशद्रोह्यांशी,
अन् फुटीरवाद्यांशी
आपण,मिळूनी सारे...!

बांधूनी कंकण समतेचे
ठेवू निरंतर,
हा अखंड भारत
आपण,मिळूनी सारे...!

करुया मित्रांनो
हा नव संकल्प,
या नववर्ष दिनी
आपण,मिळूनी सारे..!

**प्रा. के. एस. शिरबंदे,**
**दापोली**

## नववर्ष असेही यावे

बालपणीचे एखादे वर्ष
फिरून नव्याने यावे
नववर्षाचे रूप घेवूनी
नवसाज घेवूनी यावे

लहान होवूनी पुन्हा
मुक्त असे बागडावे
स्वच्छंदी होवूनी जावे
नववर्ष सहज सरावे

दोस्तांची जमावी मैफील
खेळांनी यावी रंगत
मैत्रीचे हे इंद्रधनू
कवेत अलगद घ्यावेत

कामातून मिळो उसंत
मिळो प्रियजनांचा सहवास
भागो शांततेची तहान
गप्पा रंगोत दिलखुलास

लाडीक भांडण व्हावे
अन् धरावा रुसवा
दोस्तांच्या सवे एकदा
उंचच- उंच झोका घ्यावा

बालपणीचे एखादे कॅलेंडर
पुन्हा फिरून यावे
आठवणींच्या गावात मग
स्वच्छंद जगून पहावे

कधी असेही घडावे
नव वर्षाचे गीत गावे
या वर्षात एकदा
लहान होवून पहावे

**सौ. निता सावंत- भोसले,**
**सावंतवाडी**



## सुट्यांचे नियोजन करताना......



**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

आजमितीला शहरासारख्या ठिकाणी अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यम आणि कॉन्व्हेंट शाळांत घालत असल्याने या शाळांतील विद्यार्थ्यांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी अशी मोठी सुट्टी मिळते. वर्षअखेर असल्याने शिल्लक सुट्या संपवायच्या हेतूने नोकरी करणारे पालक सुद्धा या कालावधीत सुट्या घेऊन सहलीचा प्लान करतात. यानिमित्ताने पर्यटन तर होतेच शिवाय नेहमीच्या धकाधकीच्या जीवनाला बाजूला करून वेगळे जीवन जगताना कुटुंबासाठीही वेळ दिला जातो. या मिळालेल्या सुट्टीचा उपयोग अनेकदा पालक केवळ मौजमजेसाठी करताना दिसतात त्यासाठी रिसॉर्ट, वॉटर पार्क किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा बेत आखला जातो. ज्यांच्या घरात शाळकरी मुले आहेत अशांनी सुट्यांचे नियोजन करताना पर्यटनासोबत मुलांच्या ज्ञानात कसा भर पडेल आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांना शिक्षणातही कसा होईल याचाही विचार करायला हवा. आपल्या अद्वितीय पराक्रमाने, इच्छाशक्तीने आणि चातुर्याने इतिहास घडवणारे भारतातील महापराक्रमी राजे-महाराजे इतिहासाच्या पुस्तकातून मुलांना ज्ञात होतात. त्यांच्या पराक्रमांची साक्ष देणारे गड, दुर्ग, किल्ले यांची माहिती मिळते; मात्र ते जवळून अनुभवण्यासाठी, त्यांच्या पराक्रमाच्या आणि बलिदानाच्या खुणा डोळ्यांनी पाहण्यासाठी, त्यांचे अद्वितीय शौर्य प्रत्यक्ष न्याहाळण्यासाठी मुलांना अशा ठिकाणी घेऊन जाण्यासाठी हीच नामी संधी असते. त्यादृष्टीने गड-किल्ले दर्शनाचा समावेश सुट्यांच्या नियोजनात करायला हवा. महाराष्ट ही साधू संतांची भूमी आहे.व्यवहार करताना परमार्थ कसा करावा याची शिकवण देऊन जीवनाचा उद्धार करण्याचा मूलमंत्र देणारी कितीतरी संत महंत मंडळी, अवतारी पूरूष महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांच्या वास्तव्याने आणि सहवासाने पुलकित झालेली अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत. एरव्हीच्या धकाधकीच्या जीवनातून काहीकाळ बाजूला काढताना या चैतन्यमय ठिकाणी मुलांना घेऊन जाऊन त्यांच्यासह स्वत:ही तेथील सात्त्विकतेचा लाभ घ्यायला हवा. महाराष्ट्रभूमी जशी साधुसंतांची भूमी आहे तशी अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अध्यात्मिक भूमी म्हणूनही महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे. अष्टविनायक, विविध शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग या भूमीत वसली आहेत. या प्रत्येक क्षेत्राचा एक वेगळा इतिहास आहे. दूरचित्रवाहिनींवरील मालिका, ग्रंथ आणि इंटरनेट आदींच्या माध्यमातून आपण तो जाणून घेतलेला असतो. हा इतिहास जवळून जाणून घेण्यासाठी आणि तेथील चैतन्य आणि शक्ती अनुभवण्यासाठी अशा ठिकाणी कुटुंबासह जायला हवे. याशिवाय स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, विचारवंत, समाज सुधारक यांच्या स्मारकांना भेट देऊन त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी मिळालेल्या सुट्टीचा उपयोग करता येईल. यंदाच्या ख्रिसमस व्हॅकेशनच्या सुट्ट्यांचे नियोजन करताना पालकांनी या गोष्टीही ध्यानात घेऊया !

## ग्रंथालय- एक मंदिर

**ग्रंथ हेचि गुरु। ग्रंथ हेचि देव।**
**होई देवघेव। विचारांची॥**

महाबळेश्वर जवळील भिलारे नावाच्या पुस्तकांच्या गावात गेल्यावर्षी आमची सहल गेली होती. शेती उत्पादनांइतकेच पुस्तकांनी समृद्ध असलेले हे गाव बघताना व अनुभवताना फार मोठे समाधान लाभले. गावातील प्रत्येक घरात दर्शनी भागात दिसणारे समृद्ध व नीटनेटके ग्रंथालय, पुस्तक भेट देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्याची पद्धत आवडली. आमचे शिक्षक सांगतात, आज ज्या प्रकारे हे भिलारे गाव ग्रंथालयांनी समृद्ध दिसते, तशी पुर्वीची गावे अशी ग्रंथालयांनी समृद्ध होती. आमच्या गावातले नाना आपटे नावाचे आजोबा नेहमी म्हणत," गावात एखाद्या वेळेस देवाचे मंदिर किंवा देवालय नसले तरी चालेल. परंतु गावात एखादे तरी समृद्ध ग्रंथालय मात्र अवश्य असावे. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे भांडार नसते. तर तो संपूर्ण गावासाठी, किंबहुना जगासाठी अखंड ज्ञानाचा उर्जास्रोत असतो.

पुस्तके खरे तर एखाद्या दैवी शक्तिपेक्षाही फार मोठी कामगिरी करतात. माणसांचे अज्ञान दूर करून त्यांना ज्ञानी बनविण्याचे, वाट चुकलेल्येला सन्मार्गावर आणण्याचे काम पुस्तके करतात. एखाद्या देवालयासारखा ग्रंथालयांचा कधी जीर्णोद्धार करावा लागत नाही. कारण पुस्तके कधीही कालबाह्य किंवा जीर्ण होणारी नसतात. केवळ भौतिक दृष्टीने एखादा ग्रंथ जीर्ण झाला तरी त्या पुस्तकात लिहीलेले विचार, शब्द नेहमीच तेजस्वी व नवे असतात.

अडलेल्याला, चुकलेल्याला वाट दाखविण्याचे काम पुस्तके करतात. एखाद्याच्या मनात अविचारांचे जंजाळ व गुंतागुंत वाढली तर त्याला त्या जंजाळातून मुक्त करण्याचे काम पुस्तके करतात. एखाद्या भ्रमिष्टाला ताळ्यावर आणण्याचे काम पुस्तके करतात. वाचकाला निरंतर सकारात्मक उर्जेचे किरण दाखविण्याचे काम पुस्तके करतात. माणसाला सन्मार्गावर आणण्यासाठी एखादी दैवी शक्ति जेवढे करू शकणार नाही असे प्रचंड काम पुस्तके करतात. ज्याप्रमाणे एखाद्या महासागरात बुडणाऱ्या जहाजाला वाचविण्यासाठी त्यातील लोक देवाचा धावा करतात. मात्र प्रत्येक वेळेस देव मात्र धावून येईलच याची शाश्वती नसते. मात्र एखाद्या अडलेल्या माणसाच्या हाताशी एखादे पुस्तक असेल तर तेच आवश्यक व वास्तविक माहितीच्या किरणोत्सर्गाने माणसाच्या मदतीस धावून जाते. त्याला कोणाही दैवी शक्तिच्या चमत्काराची गरज उरत नाही. त्यामुळेच एखाद्या गावातील ग्रंथालय हे त्या गावासाठी एखाद्या ग्रामदैवतासारखेच किंवा देवालयासारखेच असते. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

व्रत वैकल्ये कशास आता
हाती माझ्या पुस्तक असता
आशीष देई सहस्र हस्ते
देव तेचि अन तेचि गाथा॥

**कु. श्रावणी कोळंबे,**
**इयत्ता- सातवी.**






## माझी वसुंधरा

**शुद्ध जल समृद्ध धरा**
**नटली सजली वसुंधरा**
**स्वर्गाहूनही रम्य भासते**
**सुंदर माझी वसुंधरा!**

अंतराळातून आपल्या पृथ्वीकडे बघताना भारताचा पहिला अंतराळवीर असलेल्या राकेश शर्मांच्या मुखातून शब्द बाहेर पडले," सारे जहॉंसे अच्छा, हिंदुस्ताँ हमारा! आता राकेश शर्मा हे भारतीय असल्यानेच त्यांना अवकाशातून आपला भारत देश सर्वात सुंदर दिसला असावा. मात्र अंतराळात किंवा परग्रहावर वास्तव्य केलेल्या प्रत्येक मानवाला निश्चित वाटले असेल की, आपली पृथ्वीच खरेतर फार सुंदर आहे. आपल्या पृथ्वीवरील निळे समुद्र, हिरवे डोंगर पाहिल्यावर कोणाला आपली ही वसुंधरा सुंदर दिसणार नाही! संपूर्ण सूर्यमालेतील सजीवसृष्टी असलेला एकमेव ग्रह म्हणजे आपली वसुंधरा. येथे अशी सजीवसृष्टी असल्यानेच आपल्या वसुंधरेचे संपूर्ण सूर्यमंडळात आगळे वेगळे असे स्थान आहे.

पुर्वीचा मानव तर या वसुंधरेला देव मानत होता. तिची मनापासून पूजा करीत होता. स्वतःला या वसुंधरेचे लेकरू समजत होता. माणूस हा खऱ्या अर्थाने वसुंधरेचा मित्र होता. तिच्याच छायेत, सहवासात तो राहत होता. तिच्याकडून मिळेल तेवढेच घेत होता, ती देईल तेवढेच स्वीकारत होता. वसुधरा म्हणजे निसर्ग आणि माणूस असे परस्परांचे अतूट नाते होते. तेव्हाच्या माणसाला अति हाव नव्हती, स्वार्थ नव्हता. निसर्गाला, पर्यायाने वसुंधरेला देव मानणारा मानव तिला ओरबाडण्यासारखा दुष्ट विचार अगदी स्वप्नातदेखील करु शकत नव्हता. माणसाचे वसुंधरेवर प्रेम होते, तितकेच प्रेम वसुंधरेचे माणसावर होते. माणसांचे दिनक्रम, नित्याचे व्यवहार, शेती-भाती, उद्योगधंदे हे सारे निसर्ग नियमांनुसार चालत होते. त्यामुळेच माणसाला वसुंधरेचा आधार होता आणि वसुंधरेला माणसाचा अभिमान!

मात्र काळ जसा जसा बदलत गेला तसे माणूस आणि वसुंधरेमधले नातेसंबंध बिघडू लागले. माणसाला आपल्या हुशारीचा, बुद्धीचा, ज्ञानाचा गर्व झाला. ज्या वसुंधरेच्या पंखांच्या छायेत, उबेत तो वाढला, त्याच वसुंधरेला ओरबाडण्याची, विस्कटण्याची, जखमा करण्याची भाषा तो बोलू लागला. त्याहीपुढे जाऊन त्याने आपली जीवनदात्री असलेल्या वसुंधरेचे लचके तोडण्यास सुरुवात केली. विज्ञान, तंत्रज्ञानात प्रगती झाली, औद्योगिक क्रांती झाली. माणसाचे राहणीमान बदलले, माणसाच्या गरजा बदलल्या, बेसुमारपणे वाढत गेल्या. थोडक्यात मानवाचा दानव बनला. पुर्वीचे नातेसंबंध माणूस विसरून गेला. 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' या उक्तीनुसार माणसाने वसुंधरेवरच घाव घालण्यास मागे पुढे पाहिले नाही. राक्षसी मानसिकता बनलेल्या व निढावलेल्या माणसाला आता वसुंधरेबद्दलची माया अजिबात राहिली नाही. आपली राक्षसी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्याने वसुंधरेच्या सर्वांगावर घाव घालून रक्तबंबाळ केले आहे. खोदकाम, खाणकाम करून माणसाने तिला आतून अनंत यातना दिल्या आहेत. वसुंधरेची भरजरी वस्त्रे असलेले हिरवे डोंगर, निळ्यांशार नद्या आता अखेरच्या घटका मोजत आहेत. प्रचंड व आत्यंतिक वेदनांनी व्याकूळ झालेली वसुंधरा आता जर्जर व विदीर्ण मनाने तिचा सपूत असलेल्या माणसाकडेच आर्त विनवणी करून प्राणांचे दान मागत आहे,

**काय माणसा चुकले माझे**
**विचार करुनी सांग जरा**
**जन्म दिधला सारे दिधले**
**काय चुकली रे वसुंधरा?**

**कु. प्रसाद शिगवण,**
**इयत्ता- सातवी.**



## माझा आवडता ऋतू

पावसाळ्यानंतर येतो तो ऋतू म्हणजे हिवाळा. हिवाळा या ऋतूत आपण स्वेटर, कानटोपी घालतो. हिवाळा या ऋतूत आपण शेकोटी पेटवतो व आपण शेकोटीची मजा घेतो. हिवाळा या ऋतू खूप थंडी असते. हिवाळा या ऋतूला शरद ऋतू असेही म्हणतात. हिवाळा हा ऋतू नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांपर्यंत असतो. हिवाळा या ऋतूमध्ये दिवस लहान व रात्र मोठी असते. हिवाळा या ऋतूमध्ये झाडांना पालवी फुटते. हिवाळा या ऋतूत सकाळचे दवबिंदू पडतात. दवबिंदूनाच आपण खार असेही म्हणतो. हिवाळ्यात वातावरण खूप प्रसन्न व आल्हाददायक असते. पहाटेच्या वेळी जी धोक्याची चादर पसरलेली असते ती अनुभवायला खूप आनंद मिळतो. हिवाळा ऋतू निरोगी फळे आणि हिरव्या पाले भाज्यांचा हंगाम असतो. आरोग्याच्या बाबतीत हा हंगाम चांगला आहे. या ऋतू गरम- गरम पकोडे आणि चहा मला खूप आवडतो. या ऋतूत दिवाळी, नाताळ, मकरसंक्रांत असे विविध सण येतात. हिवाळा या ऋतूत मन खूप प्रसन्न राहते. मला हा ऋतू खूप आवडतो.

**कु. अथर्व रांगले,**
**इयत्ता- सातवी**

